MHAU050018692020

**विशेष दिवाणी दावा क्र.२६/२०२०**

**युसुफ अली व इतर विरुध्द लैलाबी व इतर**

## <u>नि.क्र.३३ वरील आदेश</u>
## <u>(पारीत दि.२०.०१.२०२६)</u>

वादींनी प्रस्तुतचा अर्ज मृतक प्रतिवादी क्र.१ लैलाबी भ्र. मुसाखॉ पठाण यांचे कायदेशीर वारस / अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यसाठी दाखल केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ दि.२२.०३.२०२४ रोजी मौजे शिवूर येथे मयत झाली. तिला अर्जाच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेले प्रस्तावित प्रतिवादी हे कायदेशीर वारस/प्रतिनिधी आहेत. वादींचे पुढे असे कथन आहे की, न्यायाचा हेतु साध्य करण्याकरीता व त्यांना न्याय मिळण्याकरीता मृतक प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. जर तसे झाले नाही, तर त्यांचे नुकसान होईल. तसेच दावा गुणदोषांवर निकाली निघणार नाही. उपरोक्त विधानांसह, वादींनी त्यांचा अर्ज खर्चासह मंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादींनी वादींच्या अर्जावर त्यांचा खुलासा दाखल केला आहे.

४. अर्ज व त्यावरील खुलासा वाचला, तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादींनी नि.क्र.३६ सोबत सादर केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.१ लैलाबी भ्र. मुसाखॉ पठाण ह्या दि.२२.०३.२०२४ रोजी पैगंबरवासी झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यू पश्चात दि.२२.०४.२०२५ पर्यंत वादीने तिचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे गरजेचे होते, परंतु वादींना तिचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्याकरीता अक्षम्य विलंब झालेला आहे. असे असले तरी, नि.क्र.३१ वरील आदेशान्वये वादींना मृतकाचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादींनी वादींचा अर्ज मंजुर करण्यास ठोस आक्षेप घेतलेला नाही. वादींच्या दाव्याचे स्वरुप, त्यात मागणी केलेले दिलासे, दावा गुणदोषांवर

निकाली काढण्याची असलेली निकड, नैसर्गिक न्यायतत्वे व प्रतिवादींचा नसलेला ठोस आक्षेप या सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता; वादींचा अर्ज मंजुर करणे योग्य व न्यायसंगत ठरेल. प्राप्त परिस्थितीत, पुढील आदेश पारीतः

**आदेश**

१. अर्ज (नि.क्र.३३) मंजूर करण्यात येतो व वादींना मृतक प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर वारस/प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.
२. वादींनी १४ दिवसांच्या आत मृतक प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर वारस/प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याबाबत योग्य ती दुरुस्त करुन, विशोधीत दावा व त्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी; अन्यथा दावा प्रतिवादी क्र.१ विरुध्द उपशमन होवून पुढे चालेल याची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2026.01.21 11:56:09 +0530

**( ए. बी. शेख )**

दि.२०.०१.२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वैजापूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पीडीएफ करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाखे नावः– अनंत वि. चोपडे (लघुलेखक श्रेणी–२).
न्यायालयाचे नावः– दिवाणी न्यायालय, व.स्तर, वैजापूर
आदेश दिनांकः– २०–०१–२०२६
आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांकः– २१–०१–२०२६
आदेश अपलोड केल्याचा दिनांकः– २१–०१–२०२६

.................................................................